# वाघोली
# शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पाचे यश

१९९३ पासून आत्तापर्यंत सुमारे ३००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे शिक्षण घेतले असून, हे विद्यार्थी जीवनाच्या विविध क्षेत्रामध्ये अतिशय दमदार वाटचाल करीत आहेत.

या प्रकल्पामध्ये शिकून, लातूर, किल्लारी, सास्तूर या पूर्वीच्या भूकंपग्रस्त भागात परतलेली मुले आज जिल्ह्यामध्ये निर्व्यसनी आणि गुणी म्हणून प्रसिद्ध आहेत. केवळ स्वतःचाच नव्हे, तर आपल्या भागाचा विकास करण्यासाठी ही मुले सातत्याने कार्यरत आहेत.

आदीवासी मुलांच्या कल्याणासाठी शासनाच्या विविध योजनांच्या संधींचा, जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी या प्रकल्पातील मुले, त्यानी संपादित केलेल्या शैक्षणिक कलाकौशल्यामुळे पात्र ठरत आहेत.

या प्रकल्पातील विद्यार्थी केवळ शिकून पास होतात, असे नव्हे तर आत्मविश्वासू आणि स्पर्धात्मक होतात. भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी तयार होतात. समाजामध्ये बदल घडविण्यासाठी प्रतिनिधी म्हणून पुढे येताना दिसतात. **भारतीय जैन संघटनेने** अनेक वर्षे सातत्याने केलेल्या कामाचे, हे आज भरभरून दिसणारे यश आहे.

गरजांची ती पूर्ती करोनी
ममत्व त्या देती
भविष्य उज्ज्वल करून त्यांचे
माणूस म्हणून घडविती.





कला कौशल्य

निर्व्यसनी व गुणी

वैयक्तिक लक्ष



क्रिडा स्पर्धा



आत्मविश्वास



BJS
Bharatiya Jain Sanghatana

**भारतीय जैन संघटना,**
पुणे-नगर रोड, बकोरी फाटा, वाघोली, पुणे - 412 207.
फोन: 020-69333317
वेबसाईट: www.bjsindia.org

BJS
भारतीय जैन संघटना

भारतीय जैन संघटनेचे
# वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्प
Bharatiya Jain Sanghatana's
## Wagholi Educational Rehabilitation Center (WERC)



# भारतीय जैन संघटना

## पार्श्वभूमी

शांतीलाल मुथ्था यांच्या नेतृत्वाखाली १९८५ साली **भारतीय जैन संघटने (बीजेएस)** ची स्थापना झाली. शिक्षण, समाज विकास यांबरोबरच आपत्ती व्यवस्थापनाच्या क्षेत्रामध्ये भारतीय जैन संघटने चे कार्य अविरत चालू आहे.

**बीजेएस** चे मुख्य कार्यालय पुण्यामध्ये असून, शासन, विविध स्वयंसेवी संस्था व अनेक मान्यवर व्यक्तींबरोबर **बीजेएस** काम करीत आहे. संघटनेच्या कार्यकर्त्यांचे जाळे भारतभर पसरले आहे. प्रश्नांची जाण असणारे कार्यकर्ते व विकसित तंत्र असणा-या आणि पूर्णपणे अराजकीय असलेल्या **भारतीय जैन संघटने**ला जागतिक दर्जाचे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. शासनाने व भारतातातील अनेक संस्थांनी **भारतीय जैन संघटनेने** उभारलेल्या कामाची प्रशंसा केली आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षण, जीवनमान उंचावणारा समाज विकास आणि कोणत्याही आपत्तीच्यावेळी अतिशय वेगाने धावून जाणारी यंत्रणा उभारणे आणि त्यासाठी उत्कृष्ट कौशल्यं असणारी कार्यकर्त्यांची फळी तयार करणे, हे **भारतीय जैन संघटने** चे ध्येय आहे.



## वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्प



१९९३ साली लातूर भूकंपामध्ये १० हजार जण मृत्युमुखी पडले, अनेकांचे जीवन उध्वस्त झाले. ह्या भूकंपग्रस्त भागातील १००० मुलांना शिक्षणासाठी पुण्यात आणून भारतीय जैन संघटने ने **वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्प** सुरु केला.

लातूर, उस्मानाबादची मुले शिक्षण पूर्ण करून गेल्यानंतर, १९९७ मध्ये जबलपूर, २००५ साली जम्मू-काश्मीर, अशा ठिकाणी जेंव्हा नैसर्गिक आपत्ती आली, त्या त्या वेळी तेथील मुलांना **वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पा** मध्ये प्रवेश दिला.

सध्या मेळघाट, ठाणे-पालघरमधील आदिवासी भागातील मुले या प्रकल्पात येत असून, आता ही मुले त्यांचे शिक्षण उत्तम पद्धतीने पूर्ण करीत आहेत.

**वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्प** १० एकर जागेमध्ये उभा असून, मुलां-मुलींसाठी शाळा, स्वतंत्र वसतीगृहे, तसेच महाविद्यालयाची स्वतंत्र इमारत, जेवणाची उत्तम व्यवस्था केलेली असून, या पुनर्वसन केंद्रामध्ये मुलांना दर्जेदार शिक्षणाबरोबरच, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व शालेय जीवनाचा आनंद उपभोगण्यासाठी विविध सोयी-सुविधा मोफत दिल्या जात आहेत.

प्रत्येक उपक्रमासाठी स्वतंत्र शिक्षक, मुलांसाठी मानसिक सल्ला-समुपदेशन, वैयक्तिक लक्ष देणारे आणि आत्मीयता असणारे कर्मचारी आणि शिक्षक, तसेच मूल्यशिक्षण आणि संस्कृतीची जपणूक करणारी व्यवस्था यांमुळे या प्रकल्पाचे आज देशभरामध्ये नाव आहे.

## वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पाची प्रगती

लातूर भूकंपग्रस्त भागातील मुलांनी, याच प्रकल्पामध्ये इयत्ता ५ वी पासून, पदवीपर्यंतचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आणि आज ही मुले परत आपापल्या भागामध्ये जाऊन, उत्तम ठिकाणी नोकरी अथवा व्यवसाय करीत आपल्या पायावर समर्थपणे उभी आहेत.

**वाघोली शैक्षणिक पुनर्वसन वसतिगृहातील** दहावीच्या मुलांचा निकाल गेली अनेक वर्षे सातत्याने १०० टक्के लागत असून, कोणतीही शैक्षणिक पार्श्वभूमी नसलेल्या आदिवासी भागातील मुलांनी, या प्रकल्पात आल्यानंतर इतर मुलांच्या बरोबरीने शालांत परीक्षेमध्ये मोठे यश संपादन केले आहे.

केवळ परीक्षाच नव्हे, तर नवोदय विद्यालय, राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा, राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरच्या शालेय क्रीडा स्पर्धा अशा सर्वच ठिकाणी ही मुले आज चमकत असून, आत्मविश्वासाने पुढे जात आहेत.

**या वर्षी आदिवासी विद्यार्थीच दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत शाळेत पहिला आला आहे**

